*(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)*

***NAVJYOT / Vol. XII / Issue - II*** ***ISSN 2277- 8063***

# "स्वातंत्र्य चळवळ आणि स्वातंत्र्यसैनिक वसंतदादा पाटील"

**डॉ. सौ. श्रध्दा विनोद कोठावळे,** राज्यशास्त्र, विभाग प्रमुख,
सहकारभूषण एस. के. पाटील महाविद्यालय, कुरूंदवाड, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर.
kothavaleshraddha@gmail.com

---

**प्रस्तावना -**

1929 मध्ये महात्मा गांधी यांनी सविनय कायदेभंगाची चळवळ सुरु केली. 1930 साली साबरमतीच्या काठावर मूठभर मीठ उचलून ब्रिटीशांनी मिठावर लावलेला कराच्या निषेधार्त कायद्याचा भंग केला. मिठाच्या सत्याग्रही चळवळीत त्यांना अभूतपूर्व यश मिळाले. त्यानंतर त्यांनी आपले लक्ष मद्यपान विरोधाकडे केंद्रित केले. सोलापूर परिसरात ताडीची उदंड जंगले होती. सोलापूरच्या काँग्रेसच्या तरुणांनी हिप्परगी तलावाच्या जवळची ताडीच्या झाडाची तोड करुन ताडी उत्पादन बंद करण्याचे ठरविले. या चळवळीत सोलापूरच्या चार हुतात्म्यांचे बलिदान कामी आले. तो दिवस संक्रांतीचा होता. याचा परिणाम छोढ्या वसंताच्या मनावर झाला. त्या दिवशी वसंतदादा सांगलीत मित्रासमवेत होते. सोलापूरच्या हुतात्म्यांच्या स्मृतीनिमित्त काहीतरी त्याग करण्याची कल्पना मित्रांमध्ये निघाली. त्यामध्ये पहिल्यांदा उत्स्फुर्तपणे चहा सोडण्याचा संकल्प वसंताने केला. तो त्यांनी 15 ऑगस्ट 1947 रोजी चहा पिऊन सोडला. वसंताला वर्तमानपत्र वाचण्याची व राजकीय चळवळीची माहिती घेण्याची आवड होती. त्यांच्या मित्रांनी एक गांधी टोपी आणून वसंताला घातली. त्यानंतर 6 वी व 7 वी चे शिक्षण त्यांनी सांगली येथील पेठ भागातील 1 नं. च्या शाळेत पूर्ण केले.

सांगली हे त्यावेळी आर.एस.एस.चे प्रमुख केंद्र होते ते आर.एस.एस. मध्ये दाखल झाले पण अल्पावधीतच त्यांचे विचार न पटल्याने बाहेर पडले. राजकीय चळवळीत सातारा जिल्हा नेहमीच अग्रेसर होता. खेड्यात आणि शहरात काँग्रेस कमिट्या स्थापना होत होत्या. त्याच वेळी अँनी बेझंट यांनी होमरुल चळवळ सुरु केली होती. स्वातंत्र्याची जाणीव लोकांमध्ये निर्माण करण्यास ही चळवळ कारणीभूत ठरली. स्वातंत्र्याची चळवळ दडपण्यासाठी रौलेट ॲक्ट पास केला. त्याचा भारतभर निषेध झाला. जालियनवाला बाग येथे गोळीबार केला गेला. 1930 साली काँग्रेसने असहकाराची मोहिम सुरु केली. सातारा जिल्ह्यात कॉग्रेस नेत्यानी सत्याग्रहाची चळचळ सुरु केली. या सत्याग्रहाचे फलित म्हणून महात्मा गांधी व आर्यविन करार झाला. दरम्यान 16 डिसेंबरला पंडित नेहरुंचा सातारा जिल्ह्यातून रात्री दौरा सुरु झाला. 25 डिसेंबर 1931 रोजी नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी सातारा, कराड, वाई या ठिकाणी भेट देवून तरुणांना स्वातंत्र्य चळवळीत भाग घेण्याचे आवाहन केले. ब्रिटीशांनी 1932 रोजी महात्मा गांधींना अटक करुन देशभर असंतोष पसरविला. त्याचा निषेध देशभर व सातारा जिल्ह्यात करण्यात आला. पंडित नेहरुंनी 1935 च्या निवडणूकीच्या प्रचारासाठी सातारा, कराड येथे दौरा केला. 1937 च्या निवडणूकीनंतर काही काळ साताराचे रा.ब. धनाजी शहा कूपर मुंबई राज्याचे मुख्यमंत्री झाले. एकूण आठ राज्यात काँग्रेसनी आपली मंत्रीमंडळे बनविली होती. त्याच वेळी तासगावला चिंतोपंत काळे यांनी लोकसंघाच्या उपक्रमाद्वारे संतूकताईची मोहिम सुरु केली. वसंतरावनी पद्माळे येथे गाव काँग्रेस कमिटी स्थापन केली. तासगांव तालुक्यात अंकलखोप येथील दत्तोबा सुर्यवंशी, धुळाप्पा आण्णा नवले हे बहुजन समाजातील काँग्रेस कार्यकर्ते होते. तासगांव तालुक्यातील कुपवाड व पद्माळे ही गांवे काँग्रेसच्या कमिटीचे अध्यक्ष म्हणून कुपवाडचे आर.पी.पाटील यांची 1939 मध्ये निवड करण्यात आली. वसंतराव आता तालुका काँग्रेसचे चिटणीस म्हणून नेमले गेले. काँग्रेसमध्ये पदाधिकाऱ्यांनी खादी वापरणे आवश्यक होते. तो काळ कार्यकत्यांनी पायी जाण्याचा होता. पक्षाकडे पैसा व साधने अपूरी होती. अशा परिस्थितीत कार्यकर्त्यांना पक्षांचे काम करावे लागत होते. त्याचवेळी घरामध्ये त्यांच्या लग्नाविषयी चर्चा चालू झाली. त्यांच्या मामांच्या मुलीसोबत सत्यशोधक पध्दतीने त्यांचे लग्न झाले.

एप्रिल 1940 च्या रायगड काँग्रेस अधिवेशनात संपूर्ण स्वातंत्र्यससाठी घटना परिषदेची मागणी केली गेली. त्याचवेळी सरदार पटेल यांनी सातारा जिल्ह्याच्या दौऱ्यात काँग्रेसच्या आग्रही भूमिकेचा पुरस्कार केला. तसेच

साताऱ्यालाही तरुण सत्याग्रहाचे शिबीर घेतले होते. या शिबीरास वसंतदादा हजर होते. देशात महात्मा गांधी यांनी वैयक्तिक सत्याग्रहाची घोषणा केली. या सत्याग्रहाचे पहिले सत्याग्रही महात्मा गांधीचे शिष्य विनोबा भावे हे होते. त्यांनी पवनार येथे युध्द विरोधी वैयक्तिक सत्याग्रह रहित केला. सर्वांना स्वातंत्र्य पाहिजे होते. वेगवेगळया मार्गाने सर्वजण प्रयत्न करीत होते. या घडामोडीत 1941 चे वर्ष संपले.

ऑक्टोंबर 1941 मध्ये सत्याग्रही कार्यकर्ते वसंतराव यांची येरवडा जेलमधून सुटका झाली. वर्धा येथे 6 जुलै 1942 रोजी काँग्रेस कार्यकारिणीची बैठक आयोजित केली होती. "चलेजाव" या ठरावाचा मसुदा त्या ठिकाणी तयार करण्यात आला. या बैठकीतील निर्णय आणि पुढील चळवळीचे आदेश प्रांतिक जिल्हा आणि तालुका पातळीपर्यंत येऊन पोहचले. या अधिवेशनानंतर काँग्रेसने अंतिम लढा देवून ब्रिटीश सत्ता संपविण्याचा निर्धार केला होता. 7 ऑगस्ट 1942 ला अधिवेशनास सुरुवात झाली. पंडित नेहरुंनी वर्धा येथे कार्यकारिणीने तयार केलेल्या मसुद्याप्रमाणे "चलेजाव" ठराव मांडला. सरदार वल्लभभाई पटेल यांनी त्यास पाठिंबा दिला. इतर नेत्यांनीही त्याला दुजोरा दिला व 8 ऑगस्ट रोजी ब्रिटीशांनी भारत सोडून जाण्याचा निर्वाणीचा इशारा देण्यात आला. स्वातंत्र्य प्राप्तीसाठी "करेंगे या मरेंगे" या महात्मा गांधीच्या घोषणेने या अधिवेशनाची समाप्ती झाली. अरुणा आसफअली यांनी तिरंगी झेंडा फडकवून काँग्रेसच्या कार्यकर्त्यांसमोर उत्तेजनपर भाषण केले. पोलीसानी कार्यकर्त्यांवर लाठीमार करुन अश्रुधुराचा वर्षाव केला. धरपकड सुरु झाली. वसंतराव मात्र अश्रुधुराचा त्रास सहन करीत तेथेच थांबले व परत ते आपल्या मुक्कामी निघून गेले. परतीच्या रस्त्यावरच कार्यकर्त्यांना अटक होण्याची शक्यता होती. अद्याप वसंतराव व इतर कार्यकर्ते यांच्यावर पकड वॉरंट निघाले नव्हते. त्यामुळे महत्वाचे कार्यकर्ते एकत्र करुन बैठक घेण्याचे ठरले. ही बैठक अंकलखोपचे तात्या सुर्यवंशी यांच्या घरी झाली व स्वातंत्र्य मिळेपर्यंत भूमिगत राहूनच लढा देण्याचे ठरले. वसंतरावांनी तासगांव तालुक्यातील गावोगावी फिरुन चावडीवर राष्ट्रीय ध्वज उभारण्यास प्रोत्साहन देण्यास व कार्यकत्यांना 8 ऑगस्टच्या भाषण करुन सत्याग्रह केला. त्यामुळे त्यांना अटक झाली.

शंकरराव देव यांनी सातारा जिल्ह्यातील वैयक्तिक सत्याग्रहांची यादी महात्मा गांधीना दिली. महात्मा गांधीच्या आदेशाप्रमाणे सातारा येथे भाऊसाहेब सोमन व तात्यासाहेब साठे यांनी सत्याग्रह केला. कुपवाडच्या आर.पी. पाटील यांनी धामणी येथे, गंगाराम पवार यांनी येळावी येथे दीपचंद व्होरा यांनी कुपवाड येथे, वि.स. पागे यांनी तासगांव येथे, धुळाप्पा नवले यांनी भिलवडी येथे युध्दविरोधी भाषणे करुन सत्याग्रह केला. वसंतदादा त्यावेळी तालुका काँग्रेस कमिटीचे सेक्रेटरी होते. त्यांची वैयक्तिक सत्याग्रहासाठी निवड झाली. वसंतरावांना पहिल्यापासून भाषणाचा तिटकारा होता. लांबलचक भाषण करण्याऐवजी छोटेसे भाषण करुन सत्याग्रह करण्याचे त्यांनी ठरविले. पद्माळे पासून बिसूर हे ब्रिटीश हद्दीतील जवळचे गाव होते. या ठिकाणी गुरुवार दि. 24 मार्च 1941 रोजी सत्याग्रह करण्याचे ठरविले. पद्माळे गावापासून बिसूर पर्यंत 100 बैलगाड्यांच्या रथातून मिरवणूक काढण्यात आली. लोकांनी सरकारच्या अन्यायी धोरणास विरोध दर्शविण्यासाठी त्या मिरवणूकीत भाग घेतला होता. ते आपल्या भाषणात म्हणाले, ब्रिटीश हे आपले शत्रू असल्यामुळे ते खलास झाल्याशिवाय आपला देश स्वतंत्र होणार नाही. ही खलास होण्याची वेळ आली आहे. यानंतर तत्काळ त्यांना अटक करण्यात येऊन कराडला पाठविण्यात आले. त्यांच्यावर खटला भरण्यात आला. त्यांना सहा महिन्यांची सक्त मजूरीची शिक्षा ठोठावण्यात आली. व तेथूनच त्यांच्या खडतर जीवनाची सुरुवात झाली. ब्रिटीशांच्या गुलामगिरीतील तो पहिला बंदीवास होता. त्याच ठिकाणी वि.स. पागे, स्वामी रामानंद भारती, गंगाराम बापू पवार, धुळाप्पा नवले या ही सत्याग्रहीना ठेवले होते. वारंवार या सर्वांना येरवडा जेलमध्ये पाठवित असत. वाटेने जाताना भारत माता की जय, महात्मा गांधी, जवाहरलाल नेहरु या थोर पुरुषांच्या नावाचा जयघोष करीत. दुसरे महायुध्द संपताच भारताला स्वातंत्र्य मिळेल अशी घोषणा केल्यामुळे म. गांधीनी वाटावाघाटीस योग्य वातावरण निर्माण होण्यासाठी अधिवेशनाची माहिती देण्यास दोरा आयोजित केला.

प्रत्येक संस्थानात प्रजा परिषदेच्या सेवा दलाद्वारे तरुणांमध्ये क्रांतीची प्रेरणा दिली जात होती. वसंतराव सांगलीच्या सेवादलाच्या बौध्दीक वर्गास हजर राहत. सांगलीचे तरुण क्रांती कार्याची आखणी करीत होते. वसंतरावांचा सल्ला व मार्गदर्शन घेत होते. दि. 11 ऑगस्ट 1942 रोजी झेंडा आंदोलनाचा भाग म्हणून जिनपाल

खोत या तरुणाने पटेल चौकातील पाण्याच्या टाकीवर तिरंगा झेंडा धाडस करुन उभा केला. या घटनेमुळे सांगली मध्ये ब्रिटीश सत्तेविरुध्द निदर्शने करण्यास प्रारंभ झाला. या झेंड्याचा ब्रिटीशांनी अवमान केला. त्याविरोधात सांगलीतील जनतेने एक विराट मोर्चा काढला. तासगांव सांगली येथे तरुण काँग्रेस कार्यकर्त्यांची वरचेवर बैठकी भरत.

त्याच वेळी पुण्यामध्ये काकासाहेब गाडगीळ केशवराव जेधे यांना अटक झाल्यानंतर बंदी असूनही रोज मिरवणूका निघत असत. ग्रामीण भागातही मोर्चे काढावेत अशी सूचना आली. तासगांव तालुक्यातील कार्यकर्त्यांनाही कळविण्यात आले. 2 सप्टेंबर 1942 रोजी सकाळी 6 वाजता तासगांव तालुक्यातील सर्व भागात निरोप पाठवून चार वाजेपर्यंत तासगांव येथे हजर रहाण्यास सांगण्यात आले. किर्लोस्करवाडी, पलूस, कुंडल, आमणापूर, बांबवडे, भिलवडी, अंकलखोप, येळावी, निभणी, सावळज, पद्माळे या भागातून बहुसंख्य लोक आले होते. हे सर्व कार्यकर्ते सूचना नसतानाही कुऱ्हाडी, भाले, तलवारी अशी हत्यारानिशी आले होते. तासगांव बाहेर भिलवडी नाक्यावर प्रचंड सभा झाली. मोर्चाचे नेतृत्व कृष्णराव कुऱ्हाडे यांनी केले. मोर्चा महात्मा गांधी, पंडीत नेहरुंचा जयजयकार करीत शिस्तीने गावात मिरवणूकीने शिरला. दिवाणी कोर्ट, मामलेदार कचेरीवर मोर्चा गेला, कचेरीवरील ब्रिटीशांचे युनियन जॅक उतरवून तेथे तिरंगी निशाण चढविले. तासगांव जेलमधील बुर्लीच्या शिवदे या राजकीय कैद्यास बाहेर आणून त्याचा सत्कार करण्यात आला. मोर्चा विसर्जीत झाला. ही बातमी सातारच्या डी.एस. पी. ना समजली. डी.एस. पी. गिलबर्ट यांनी मोर्चेवाल्यांना शोधून मारपीट करण्यास सुरुवात केली. वॉरंट काढले गेले.

वाळवा तालुक्यातील कार्यकऱ्यांनी येडे निपाणीच्या डोंगरावरही एकत्र येऊन विचार विनीमय केला. त्या ठिकाणी वसंतराव ही होते. ते दुसऱ्या दिवशी पद्माळे येथे आले.

8 सप्टेंबर 1942 ला इस्लामपूरलाही मोर्चा काढण्यात आला. त्याचदिवशी वडूज येथे ही मोर्चा काढला. त्यावर पोलीसांनी गोळीबार करुन 9 कार्यकर्त्यांना ठार केले. पाटण कचेरीवर म्हावशीकर यांनी मोर्चा काढला. शिराळा कचेरीवर बाबूराव चरणकर यांनी मोर्चा नेला. कराड कचेरीवर उंडाळकर यांच्या नेतृत्वाखाली मोर्चा काढून सभा घेतली. सातारा जिल्ह्यात भूमिगत चळवळ संपण्याऐवजी अनेक पटीनी तीव्र झाली. ब्रिटीश सत्ता खिळखिळी करण्यासाठी वसंतरावनी विध्वंसक कृत्ये करण्याची योजना आखली व त्याची सुरुवात म्हणून बुधगांव येथे टेलिफोनच्या तारा एका रात्रीत तोडून टाकल्या. भिलवडी रस्त्यावर पोस्टाची बॅग लुटण्याचे ठरविण्यात आले. सर्व कार्यकर्ते पद्माळला मळीत जमले. ही मळी वसंतरावांचे भूमीगतांचे आश्रयस्थान होते. बॅग लुटली पण त्याच्यात काही मिळाले नाही. नांद्रे व कर्नाळ स्टेशनमध्ये रेल्वे पाडण्याच्या कामातही वसंतरावना यश मिळाले होते. वसंतराव ग्रुपच्या भूमिगत कार्यकत्यांना खर्चाची विवंचना होती. अशा स्थितीत शेवटी सांगलीवाडी येथील एका व्यापाऱ्याच्या घरावर या ग्रुपने धाड घातली. वसंतरावांनी स्वत:च्या मालकीची हत्यारे जमविण्यास सुरुवात केली. ते कधी पद्माळे येथे तर कधी सांगलीत मुक्काम करीत. सांगलीत वसंतरावानाआधार होता. म्हणूनच पुढील आयुष्यात सांगली ही त्यांची कर्मभूमी झाली. ते भूमीगत राहून आपले कार्य करीत होते. अनेक वेळी जोखीम पत्करुन त्यांनी कार्य केले व त्यातच त्यांना तुरुंगात टाकण्यात आले.

वसंतदादा यांच्यावर सांगली संस्थानच्या न्यायाधीशांसमोर खटला सुरु झाला. वसंतदादांच्या क्रांती कार्याचे महत्व लोकांना पटले होते. ॲड. ज.वा. पाटणकर यांनी त्यांचे वकिलपत्र घेतले होते. स्वातंत्र्यलढा अपुरा ठेवून तुरुंगात खितपत पडण्यास दादांची तयारी नव्हती. तुरुंगाबाहेर कसे पडायचे याचाच विचार ते नेहमी करीत असत. 24 जुलै 1943 शनिवारचा बाजारचा दिवस होता. वसंतरावांना अटक होऊन दोन दिवस झाले होते. जेलच्या ऑफीसमधून खोल्यांकडे जाताना वसंतरावनी आपल्या सहकाऱ्यांना आपण आज सिनेमाला जाऊ अशा सांकेतिक शब्दात सांगितले व सर्वांनी त्याला साथ दिली. वसंतदादांसमोर पहारेकरी होता. ते शौचास जाऊन बाहेर पडताक्षणी आण्णा पत्रावळे यांनी सर्व सहकारी कैदी बाहेर असल्याचा निरोप भजी आणून देवून केला. त्याच क्षणाला बाहेर पडण्याच्या धाडसी कृतीस सुरुवात झाली. वसंतरावांनी पहारेकऱ्यांचे दोन्ही हात पकडले व हिंदूरावांनी बंदूक काढून घेतली. त्याच्या खिशातील काडतुसे घेवून बंदुकीने चढविले. पहारेकरी आणि कैदी यांच्यात झटापट चालूहोती.

सर्वजण तटावरुन खंदकात उड्या मारुन पोहून गेले. वसंतराव हिंदूराव दोघानीही उड्या मारल्या पण हिंदूरावांचे दोन्ही पाय मोडले. कसेतरी पोहत ते काढावर आले. बाकीचे कृष्णा नदीकडे पळत गेले. जेलची धोक्याची घंटा वाजू लागली. घोड्यावरुन पोलीस पाठलाग करु लागले. पत्रावळे दमले त्यांना पोलीसांनी ठार केले. वसंतदादा व पोलीस यांची चकमक चालू होती. बंदूकीचा घोडा ओढून काढीत असताना त्यांचा उजवा खांदा पोलीसांना दिसला. पोलीसांनी त्यांच्यावर नेम धरुन गोळी झाडली. ती वसंतदादांच्या खांद्यातून आरपार निघून गेली ते बेशुध्द पडले. पोलीसानी त्यांना अटक करुन सांगलीच्या हॉस्पिटलमध्ये ठेवले व ऑपरेशन झाल्यानंतर पुन्हा जेलमध्ये बंदिस्त केले. जेल फोडल्याचा खटला बरेच दिवस चालला होता. शेवटी 21 सप्टेंबर 1944 रोजी 6 वर्ष सक्तमजुरी व 500 रु. दंडाची शिक्षा झाली. पूर्वी झालेली 7 वर्षे व ही 6 वर्षे शिक्षा भोगण्यास त्यांना येरवडा जेलमध्ये सप्टेंबर 1944 मध्ये पाठविण्यात आले. वसंतदादा दंडबेडीची शिक्षा भोगत होते. यांची जाणीव सांगलीकर जनतेला होती. सांगली संस्थान व प्रजा परिषदेच्या वतीने त्यांच्या सुटकेचे प्रयत्न करण्याचे ठरले. सर्व लहानमोठ्या कार्यकर्त्यांनी दाखविलेल्या तळमळीमुळे राजसाहेबांना वसंतदादांच्या सुटकेचा निर्णय घ्यावा लागला. अखेर 25 एप्रिल 1946 रोजी येरवडा जेलमधून त्यांची सुटका झाली. ज्या रेल्वेने त्यांना माधवनगर स्टेशन पर्यंत आणले त्या डब्यावर तिरंगी झेंडे लावलेले होते. माधवनगर ते आंबराईपर्यंत त्यांना मोटारीने आणले. 30/35 हजार जनसमुदायाने त्यांचे यथोचित स्वागत केले. गौरवपूर्ण भाषणे झाली. त्या सत्कार समारंभासाठी त्यांचे 1942 च्या क्रांती लढ्यातील भूमीगत सहकारी मित्र आवर्जुन उपस्थित होते. पुढे 15 ऑगस्ट 1947 ला भारताला स्वातंत्र्य मिळाले.

**समारोप -**

शिक्षणाची परंपरा नसलेल्या लहानश्या खेड्यातील शेतकरी कुटूंबातील एक तरुण मुलगा देशाच्या स्वातंत्र्य संग्रामातच उडी घेतो 1942 च्या चले जाव आंदोलनात स्वत:च्या ऐन पंचवीशीत, भूमिगत राहून इंग्रजांच्या विरोधात हातात शस्त्र घेतो. अटकेनंतर सांगलीच्या तुरुंगातून धाडसी पलायन करतो. साथीदारांच्या सुटकेसाठी छातीवर पोलीसांच्या गोळ्या झेलतो. स्वातंत्र्यांनंतर विधायक कामात अग्रेसर राहून सहकार आणि कृषी औद्योगिक क्रांतीद्वारे ग्रामीण भागाचा कायापालट करतो. सामूहिक आर्थिक विकासाच प्रारुप सिध्द करतो. सहकार महर्षी म्हणून सन्मानित होतो. संघटन कौशल्याच्या जोरावर तळागाळापासून पक्षबांधणी करीत काँग्रेसचा अध्यक्ष होतो. सहकारातील सर्व अत्युच्च संस्थाचे नेतृत्व करतो आणि महाराष्ट्रासारख्या प्रगत राज्याचा चार वेळा मुख्यमंत्री होतो. व राज्यपाल पद ही भूषवितो. स्वातंत्र्योत्तर काळातील महाराष्ट्राच्या सामाजिक राजकीय क्षेत्रातील उत्क्रांतीचे प्रतिक आहे. म्हणूनच स्वातंत्र्यपूर्व काळात एका स्वातंत्र्य सेनानी म्हणून त्यांनी केलेल्या कार्यावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न प्रस्तुत शोधनिबंधात करण्यात आला आहे. (वसंतदादा संपा. पारेकर दशरथ ग्रंथाली प्रकाशन 2022)

**संदर्भ -**

1.वसंतदादा – धर्माधिकारी भालचंद्र – विश्वकर्मा प्रकाशन सातारा, 1986

2.यशवंतराव ते विलासराव – डॉ. मेहंदळे विश्वास, अनुबंध प्रकाशन पुणे, 2017

3.महाराष्ट्राचे मुख्यमंत्री – गोड सोपान, अविष्कार प्रकाशन पुणे 1985

4.वसंतदादा – संपादक – पारेकर दशरथ, ग्रंथाली प्रकाशन 2022

5.Freedom fighters of India - You Tube

6. Discovermh.com/vasantdada